**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या**
**सकाळी ०७.१० वा.**

**दिनांक - १४/१२/२०१७** **वार - गुरुवार**

**ठळक बातम्या**

- बोंड अळीच्या मुद्यावरून विधानसभेत गदारोळ, लक्ष्यवेधी ठेवली राखून.
- विधान परिषदेत शेतकऱ्यांच्या मुद्यांवरून कामकाज पुन्हा तहकूब.
- मर्यादित षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारत-श्रीलंकेची बरोबरी.
- सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाचा दिमाखात आरंभ.

-------------------------

**अधिवेशन**

विदर्भ आणि मराठवाड्यात कापूस पिकावरील बोंड अळीचा प्रादुर्भाव रोखण्यात "बीजी टू" हे बीटी कापसाचं वाण अपयशी ठरल्यामुळं शेतकऱ्यांना तत्काळ मदत देण्यासंदर्भात ६९ आमदारांनी दाखल केलेली लक्ष्यवेधी सूचना काल विधानसभेत राखून ठेवावी लागली. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पुरेशी माहिती उपलब्ध झाली नसल्याच्या कारणावरून अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी ही लक्ष्यवेधी राखून ठेवली. त्यामुळं सरकार बियाणे उत्पादकांना पाठीशी घालत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आणि सरकारला बोंड अळीच्या प्रादुर्भावाची पुरेशी पूर्वकल्पना असतानाही माहिती उपलब्ध का नाही, असा सवाल केला. माहिती उपलब्ध नसल्याबद्दल सरकारनं माफी मागावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली. या मुद्यावर कामकाज चारवेळा स्थगित करावं लागलं.

विधान परिषदेत तिसऱ्या दिवशीही शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चेसाठी विरोधकांनी स्थगन प्रस्ताव मांडण्याची परवानगी मागितली होती; उप-सभापती माणिकराव ठाकरे यांनी ती फेटाळून लावली. त्यानंतर झालेल्या गोंधळामुळं कामकाज प्रथम चारवेळा आणि अखेर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. विधानकार्य मंत्री गिरीश बापट यांनी सरकार राज्यातल्या विशेषतः विदर्भ आणि मराठवड्यातल्या सर्व प्रश्नांवर चर्चेला तयार असल्याचं सांगितलं. सभागृह नेते चंद्रकांत पाटील यांनीही यावेळी बोलताना स्थगन प्रस्ताव वारंवार फेटाळला जातोय, त्यामुळे चर्चेची मागणी विरोधकांनी करावी, असं सांगितलं.

-------------------------

**विधिमंडळ**

दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला चांगला भाव मिळाला पाहिजे आणि त्याचवेळी सहकारी दूध उत्पादक संघही टिकले पाहिजेत यादृष्टीनं हिवाळी अधिवेशन काळातच बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत या विषयावरील लक्षवेधी सूचनेला

उत्तर देताना सांगितलं. दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लीटर २७ रूपये इतका दर सहकारी दूध संस्थांनी द्यावा, असे आदेश देण्यात आले आहेत. अनेक सहकारी दूध संस्थांनी इतका दर देण्यास असमर्थता दर्शवली आहे. जानेवारी २०१२ ते ऑक्टोबर २०१७ दरम्यान माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत १२ हजारहून अधिक गुन्हे दाखल झाले असल्याचं मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेत लेखी उत्तरात सांगितलं.

राज्यात आजवर ६० हजारहून अधिक कंपन्या बंद करण्यात आल्या असल्याचं उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी विधानसभेत लेखी उत्तरात सांगितलं. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती योजनेत १८०० कोटी रुपये वितरित करण्यात अनियमितता झाली असल्याचं राज्याचे सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी विधानसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितलं. तर मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दोन शाखांमध्ये कर्ज वितरणात काही अनियमितता झाली असल्याची माहिती सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी विधानसभेत दिली. महावितरणला ग्राहकांकडून ३४ हजार ४९५ कोटी रुपये येणं असल्याचं ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत लेखी उत्तरात सांगितलं.

राज्यातील भटक्या आणि विमुक्त जाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागासप्रवर्गातील अधिकाधिक मुलांना आरक्षणाचा लाभ मिळावा याकरीता त्यांच्या उत्पन्न मर्यादेत २ लाख रुपयांनी वाढ करुन ती ८ लाख रूपये करण्यात आल्याचं निवेदन इतर मागासवर्ग खात्याचे मंत्री राम शिंदे यांनी विधानसभेत केलं.

-------------------------

**कलवरी पाणबुडी**

कलवरी या पाणबुडीचं जलावतरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मुंबईतील माजगाव गोदी इथं करण्यात येईल. स्कॉर्पिन-श्रेणीच्या सहा पाणबुडींपैकी ही पहिली पाणबुडी माझगाव गोदीत बांधण्यात आली आहे. या पाणबुडीची समुद्रात १२० दिवस चाचणी घेण्यात आली. टायगर शार्क माशाच्या नावावरून कलवरी हे नाव घेण्यात आलं आहे.

-------------------------

**चर्चासत्र**

संरक्षण क्षेत्रात लढाऊ विमानं आणि जहाज खरेदी करताना उत्पादनाच्या टिकाऊपणाचा गांभीर्यानं विचार होणं गरजेचं आहे, असं मत विमान विद्या विभागाचे महासंचालक सी. पी. रामनारायण यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्था आणि टेक महिंद्रातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. देशात वाहन क्षेत्रात चांगली प्रगती झाली असून पुढील काळात विमान तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

-------------------------

**सायकल योजना**

पुण्यात भाडे तत्त्वावर सायकल योजनेला लोकांचा वाढत्या संख्येनं प्रतिसाद मिळत आहे. आमच्या प्रतिनिधीनं घेतलेला हा आढावा -

**व्हॉइस कास्ट -**

या उपक्रमात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशी सायकल केवळ १ रुपया एवढ्या नाममात्र शुल्कामध्ये अर्ध्या तासासाठी भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि औंधच्या परिसरात हा उपक्रम नुकताच सुरू करण्यात आला आहे. युवकांसोबतच ज्येष्ठ नागरिकही सायकलस्वारीचा आवर्जून आनंद घेत आहेत. विद्यापीठात ५ डिसेंबरला उद्घाटनानंतर पहिल्याच दिवशी ३५७ जणांनी सायकलचा वापर सुरू केला. औंधमध्ये ७ डिसेंबरपासून ही सेवा सुरू झाल्यानंतर दोन्ही ठिकाणी हा सहभाग वाढतच चालला आहे. सायकल सेवेला मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेता सायकलींचं शहर अशी पुण्याची जुनी ओळख पुन्हा एकदा निर्माण होण्याची आशा पल्लवित झाली आहे.

शिवाराज सणस, आकाशवाणी बातम्यांसाठी, पुणे.

-------------------------

**निवडणूक**

ठाणे जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत पाच पंचायत समित्यांसाठी ६५ टक्के तर; १० नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ७२.८१ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २१ च्या पोटनिवडणुकीसाठी २९ टक्के मतदान झालं असून इतर विविध ठिकाणच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील शांततेत मतदान पार पडलं, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी काल दिली. मतमोजणी आज होणार आहे.

-------------------------

**कर्जमाफी**

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळत असून या बाबत आमच्या विविध जिल्ह्यातील प्रतिनिधींनी माहिती दिली आहे.

सातारा जिल्ह्यातील १ लाख ६९ हजार ४१७ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला असून सुमारे १८१ कोटी २९ लाख रुपये प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. महेश कदम यांनी दिली आहे.

सांगली जिल्ह्यात आतापर्यंत ६४ हजार, १०५ शेतकऱ्यांना १६४ कोटी ९१ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे. यात २५ हजार ९१० शेतकऱ्यांना १०८ कोटी ९ लाख रुपये कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तर ३८ हजार २८५ शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५६ कोटी ८२ लाख रुपये रकमेच्या अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक प्रकाश अष्टेकर यांनी दिली.

वाशिम जिल्ह्यातील ९५ हजार ८६३ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला असून १६ हजार ५४५ शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ मंजूर करण्यात आल्याची माहिती सहाय्यक उपनिबंधक रमेश कटके यांनी दिली.

-------------------------

**उडान**

केंद्र सरकारच्या उडान योजनेअंतर्गत कोल्हापूर-मुंबई प्रवासी विमानसेवा येत्या २४ तारखेपासून सुरू होणार आहे. ही सेवा दर मंगळवार, बुधवार आणि रविवारी असणार आहे. नाशिक-मुंबई ही सेवा २३ तारखेपासून सुरू होणार आहे.

-------------------------

**पत्रकार - हल्ले**

विधिमंडळात संमत झालेला पत्रकार संरक्षण कायदा आणि पत्रकारांची भक्कम एकजूट यामुळे गेल्या पाच वर्षात प्रथमच पत्रकारांवरील हल्ल्यांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे, अशी माहिती पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक एस.एम.देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात दिली आहे. कायद्याची अंमलबजावणी त्वरित झाली तर पत्रकारांवरील हल्ले पूर्णपणे थांबतील, असं समितीनं म्हटलं आहे.

-------------------------

**पुरस्कार**

वर्ध्याच्या यशवंतराव दाते स्मृती संस्थेतर्फे साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यासाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यात डॉ. भा. ल. भोळे स्मृती वैचारिक साहित्य पुरस्कारासाठी समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात यांची, सामाजिक कार्यकर्ता पुरस्कारासाठी सुनीती सु. र. यांची तर डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधक प्रेरणा पुरस्कारासाठी प्रा. राहुल कोसंबी यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी काल ही घोषणा केली. येत्या २४ तारखेला पुरस्कारांचं वितरण होणार आहे .

-------------------------

**सवाई गंधर्व संगीत महोत्सव**

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत ऐकणाऱ्या रसिकांसाठी पर्वणी असणाऱ्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवाला काल पुण्यात दिमाखात प्रारंभ झाला. महोत्सवाचं हे ६५वं वर्ष आहे. ज्येष्ठ सनई वादक पंडित मधुकर धुमाळ यांच्या सनई वादनानं महोत्सवाची मंगलमय सुरुवात झाली. त्यानंतर पंडित भीमसेन जोशी यांचे शिष्य डॉक्टर विजय राजपूत यांनी गायन सादर केलं. गीटार या वाद्यात बदल करून निर्माण केलेल्या चतुरंगी या वाद्याचं वादन पंडित देबाशिष भट्टाचार्य यांनी सादर केले. दुसऱ्या सत्रात पंडित राजन आणि साजन मिश्रा यांचं गायन झालं. ज्येष्ठ बासरीवादक पंडित हरिप्रसाद चौरासिया यांच्या बासरी वादनानं पहिल्या दिवसाची सांगता झाली.

-------------------------

**क्रिकेट**

मोहाली इथल्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारतानं श्रीलंकेवर १४१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. धरमशाला इथल्या पहिल्या सामन्यातील पराभवातून धडा घेऊन यावेळी

भारतानं कर्णधार रोहित शर्माच्या कारकिर्दीतील तिसऱ्या झुंजार द्विशतकाच्या बळावर ३९२ धावांचा डोंगर रचला. तीन सामन्यांच्या या मालिकेत उभय संघाची १-१ अशी बरोबरी झाली आहे.

-------------------------

**हवामान**

पुढील २४ तासांत राज्यात किमान तापमानात फार मोठा बदल अपेक्षित नाही असा वेधशाळेचा अंदाज आहे. राज्यात काल प्रमुख शहरांमधलं किमान तापमान असं होतं - गोंदिया इथं सर्वात कमी १० पूर्णांक पाच अंश सेल्सियस, महाबळेश्वर १३ पूर्णांक ६, नाशिक ११ पूर्णांक ६, ब्रह्मपुरी १२ पूर्णांक ७, पुणे १३ पूर्णांक ८, आणि नांदेड १५ पूर्णांक ६ अंश सेल्सियस.

-------------------------